आज अमावास्या सूर्यग्रहण अर्थात् भारतात (महाराष्ट्रांत) 2।3 ठिकाणीच दिसणार. पण हयांच्या स्मृति आजही कायम आहेत काळ हे मोठे औषध आहेच. माझी मोठी मुलगी लीना त्यावेळी (एम,एस्सी,) फिजिक्स झाली फर्स्टक्लास मधे. तिची मैत्रीण त्याच वेळी एमबीबीएस पास झाली. आनंदाची बातमी सांगायला ती आली. हयांनी पटकन पेढे आणवले तिला पेढे दिले म्हणाले. वा छान. तू आता डॉक्टर झालीस. डॉक्टरीण बाई आम्हाला तपासा फी सांगा. ती म्हणाली की का लीना पण एमएस्सी झाली की? तिचे कौतुक नाही पण तू डॉक्टर झालीस तू तुझा स्वतंत्र धंदा सुरू करू शकतेस लीनाचे तस कुठे आहे? तिला बरे वाटले. त्यानंतर मी हयांना म्हटले वीणाचे कौतुक केलेत पण स्वतःच्या मुलीला कमी लेखलेत. म्हणाले अग तिला वडील नाहीत कुणीतरी मोठ्या माणसानी कौतुक केले की आंनद वाढतो पटले मला. तीन वर्षानी माझी दुसरी मुलगी डॉक्टर (एमबीबीएस) झाली व तिची मैत्रीण कुमकुम (एम,ए,) झाली तेव्हा हयानी कुमकुमचे तोंड भरून कोतुक केले गुलाबजाम आणले तिच्या साठी. म्हणाले की एक मुलगी एम, ए, झाली मास्टर ड्रीग्री, मिळवली माझी मुलगी डॉक्टर झाली पण ग्रॅज्युएटच ना मास्टर ड्रिग्री कुठे? मी चाट. लीनाच्या वेळी वीणाची स्तुती छायाच्या वेळी कुमकुमची स्तुती. कुमकुम खालच्या वर्गातील तिला पण वडील नाहीत तिच्या भावाने तिचे शिक्षण केले म्हणून
अपूर्वाई नाही का? मी मात्र दिङ्मूढ झाले. हे विचार केल्यावर पटले. दुस-याचे चांगले गुण हुडकून त्याची स्तुती करणे हाच हयांचा मोठेपणा. शिवाय त्यांच्या घरीं त्या मुलीची स्तुति कोण करणार? कोणी शिकलेलें मोठे माणूस नाही मुख्यतः वडील. त्या दोघीनांही वडील नाहींत.

--------------------------------------------------------------------------------